www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १२३ वा गुरुवार दि. १६ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण उभारणार 29 किमी लांबीचा उरण-पागोटे -चौक महामार्ग

## मुंबई -बेंगलोर प्रवास आता सहा तासातच शक्य होणार

दैनिक युवक आधार

महाराष्ट्र प्रतिनिधी-सुमारे 3500 कोटी रुपये खर्चून गोवा, बंगलोरशी जोडणारा 29 किमी लांबीचा उरणजेएनपीए -पागोटे-चिरनेर-चौक या मार्गदरम्यान प्रस्तावित ग्रीनकॉरिडॉर सहा पदरी रस्ता तसेच येत्या काही महिन्यात सुरत -नाशिक -पुणे -चेन्नई दरम्यान रिंग रोड येत्या तीन वर्षात अस्तित्वात येणार आहे. यामुळे वाहतूक कोंडीचा ताण कमी होण्यास मदत होणार असुन मुंबई -बंगलोर प्रवासही सहा तासात शक्य होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग एन-66 ,48,348 जोडणारा उरण-पागोटे ते चौक दरम्यान 29.219 किमी लांबीचा प्रस्तावित सहा पदरी रस्ता अस्तित्वात येणार आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई,अटल सेतू, मुंबई -गोवा,आपटा, रसायनी जेएनपीए दरम्यान होणाऱ्या वाहतूकीसाठी हा 3500 कोटी खर्चाचा प्रस्तावित रस्ता अगदी सुलभ, सोयीस्कर ठरणार आहे.



पागोटे-चौक दरम्यान उभारण्यात येणारा प्रस्तावित रस्ता गोवा, बंगलोर राष्ट्रीय महामार्गाशी जोडला जाणार आहे.त्यामुळे येत्या काही महिन्यात मुंबईहून बंगलोरला दरम्यानचा प्रवास अगदी सहा तासात करणे सहज शक्य होणार आहे. पागोटे -चौक या प्रस्तावित ग्रीन कॉरिडॉर सहा पदरी 29.219 किमी लांबीच्या दरम्यान चिरनेर आणि आपटा दरम्यान दोन टनेलही उभारण्यात येणार आहेत. चिरनेर टनेलची लांबी 1.9 किमी तर आपटा टनेलची लांबी 1.7 अशी दोन्ही मिळून एकूण ट्वीन टनेलची लांबी 3.47 किमी आहे.तसेच या प्रस्तावित मार्गावर सहा मोठे आणि 5 लहान पुल उभारण्यात येणार आहेत.त्याशिवाय सर्व्हिस रोड, स्लिप रोडचा समाविष्ट करण्यात आला आहे पागोटे -चौक या प्रस्तावित ग्रीन कॉरिडॉर सहा पदरी २९.२१९ किमी लांबीच्या प्रस्तावित कामाचे डीपीआर सुरू करण्यात आले आहे.त्यानंतर लवकरच या कामासाठी निविदा मागविणार येणार आहेत.वर्क ऑर्डर दिल्यापासून ३० महिन्यांच्या मुदतीत हे काम पूर्ण करावे लागणार आहे.या प्रस्तावित रस्त्यामुळे या मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मोठी मदत मिळणार आहे.अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे उपसंचालक यशवंत घोटकर यांनी दिली.

================

# रंगनाथ नेरुरकर यांना आदर्श कलाध्यापक पुरस्कार

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल : वार्ताहर**-वि. के. हायस्कूलचे कलाशिक्षक पांडुरंग ऊर्फ रंगनाथ नेरुरकर यांना 'आदर्श कलाध्यापक' पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे मान्यता प्राप्त 'महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ' महामंडळ संलग्न नंदुरबार कलाध्यापक संघ यांच्या विद्यमाने ४३ वी कलाशिक्षण परिषद तालुका शहादा जि. नंदुरबार या ठिकाणी संपन्न झाली. या सोहळ्यामधे मूळ सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सुपुत्र आणि सध्या पनवेल येथील वि. के. हायस्कूलमधे कलाशिक्षक असलेल्या नेरुरकर याना कला व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल "आदर्श कलाध्यापक" या पुरस्काराने गौरविण्यात आले.त्याना प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल रायगड कलाध्यापक संघ, वि. के. हायस्कूलच्या मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद तसेच सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ या संस्था तसेच मित्रपरिवाराकडून रंगनाथ नेरुरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.







# सुरक्षा सप्ताहानिमित्त प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या मार्गदर्शनाखाली उरण येथे मोटार सायकल हेल्मेट रॅली

दैनिक युवक आधार

**महाराष्ट्र प्रतिंनिधी प्रमुख**-सुरक्षा सप्ताहानिमित्त प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांचे सुचनेनुसार व सहा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी निलेश धोटे,हरीभाऊ जेजुरकर कार्यालय पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली आज बुधवार दिनांक 15 जानेवारी रोजी उरण येथे वाहन चालक व वाहन मालिकांमध्ये जन जागृती व्हावी यासाठी केअर पॉइंट हॉस्पिटल ते उरण चारफाटा अशी मोटार सायकल हेल्मेट रॅली काढण्यात आली.या रॅलीचे सुरुवातीला वाहन चालकांनी वाहन चालविताना कोणती काळजी घ्यायची या बाबत माहिती देण्यात आली. त्यापमाणे उपस्थित वाहन चालक व परिवहन विभागातील अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रतीज्ञा घेतली.या रॅली मध्ये साधारण 70 ते75महिला व पुरुष मोटार सायकल स्वार व मोटार ट्रेनिंग स्कूलच्या वाहनांनी सहभाग घेतला होता.भोंडे,राकेश रावते,सहा.मोटार वाहन निरीक्षक भाऊसाहेब कदम उरण येथील श्री एकवीरा मोटार ट्रेनिंग स्कूलचे संचालक बळीराम ठाकुर,उरण मोटार ट्रेनिंग स्कूलचे दानिश मुकरी,हरी हरेश्वर मोटार ट्रेनिंग स्कूलचे जितेंद्र प्रधान, गणेश मोटार ट्रेनिंग स्कूलचे गणेश भोईर, राघोबा मोटार ट्रेनिंग स्कूलचे प्रितम पाटील तसेच उरण येथील वाहन चालक मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# मकर संक्रांत म्हणजे संक्रमणाच्या या काळात आपणही आनंदाने एकमेकींना देऊ या निरोगी आणि आनंदी जगण्याचे वाण

**दैनिक युवक आधार**


**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**–आपला हिंदू समाज म्हणजे आपल्याला सण उत्सव साजरे करण्याची मनापासून आवड असते. कारण हे सर्व करीत असताना त्यातून निर्माण होणारा उत्साह आनंद आपल्याला खुप काही देऊन जात असतो. आणि मिळणारा आनंद हा कितीतरी दिवस पुरत असतो.नवीन वर्षात येणारा संक्रात म्हणजे पहिलाच सण. त्यामुळे संक्रांत आली की आपल्यात एक प्रकारचे चैतन्य आणि उत्साह संचारतो. यावेळी थंडीचे दिवस असल्याने वातावरणातील गारवा आल्हाद निर्माण करीत असतो. बाजारात हिरव्या भाज्या फळभाज्या भरपूर प्रमाणात विक्री साठी आणलेल्या असतात.तसेच रंगीबिंगी वस्तूंनी बाजारपेठ भरलेली असते. या सगळ्या विविध वस्तू पहायला मजा येते. हजारोंच्या संख्येने वस्तू आकर्षक रितीने मांडलेल्या असतात.

दरवर्षी नवनवीन वस्तू येत असतात. आपणही दरवर्षी काहीतरी युनिक, विशेष कुणीही, कधीही बघितलेल्या नाहीत अशा वस्तू आपण शोधत असतो एकमेकींना वाण लुटण्यासाठी.एकमेकांना काहीतरी देण्यासाठी आवडणे हे चांगल्या मनाचे लक्षण आहे. "दिल्याने वाढते" अशी आपली संस्कृती आहे. पण आपण म्हणतो पण बाजारातले वस्तू एवढ्या लहान असतात की त्याचा घरी आल्यावर काय करायचं ?आणि आपल्या ज्या मैत्रिणींना हळदी कुंकवाला बोलवणार असतो त्या महिलाही कमी अधिक प्रमाणात चांगल्या आर्थिक स्थिती असलेल्या असतात. आपल्या घरी जे आहे ते त्यांच्या घरी असणार नसेल तर तर त्याची गरज कदाचित त्यांना नसेलही किंवा त्यांना दिलेल्या वस्तूं त्या वापरतील का? आवडतील का? त्या वस्तूंचे त्या काय करतील? वस्तूं खरेदी करताना असे असंख्य प्रश्न मनात येतात. शिवाय आपल्याला आवडेल ती वस्तू आपल्या बजेट मध्ये येत नाही.

कमी किंमतीच्या वस्तू बजेट मध्ये बसतात पण आपल्या ला त्या वाण म्हणून द्यायला कमीपणा वाटतो. दिलेल्या वस्तू कधी कधी कचऱ्यात किंवा इतरांना दिल्या जात असतील बऱ्याच वेळा या वस्तू प्लास्टिकच्या असतात. स्टीलच्या असल्या तरी त्याची गुणवत्ता चांगली नसल्याने घरात ही रोज कोणी वापरू शकत नाही. म्हणजेच सगळ्या गोष्टींचा कचरा होतो योग्य वापर होत नाही. त्याकरिता आपण पैसा खर्च करतो पण त्याचा उपयोग काहीच नाही.दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या घरी हळदी कुंकू करताना आपण आपल्या मैत्रिणींना घरी बोलावतो त्यासाठी आपल्याला कमालीची तयारी करावी लागते. अनेक प्रकारची छोटी मोठी कामे करावी लागतात.

घर आवरण, सुशोभित करणे, आल्यावर त्यांना काहीतरी खायला पदार्थ करणे, सुंदर डेकोरेशन करणे, यात आपण अगदी थकून जातो. मग रात्री अंग मोडून येत.एवढ करुनही कधी कधी कुजक्या सारख कुणीतरी बोलत एवढ दमत असशील तर कशाला करायचा पुन्हा आपल्याला राग येतो प्रत्येक घरात असं होत असेल असं नाही .खरंतर संक्रात म्हणजे संक्रमणाचा काळ ,दिवस चक्रात बदल घडण्याचा काळ. त्यामुळे हे एकमेकींना वाण देण्यासाठी जरा वेगळी कल्पना केली तर ?आपण आपल्यासह आपल्या मैत्रिणीसाठी अजून काहीतरी छान करूया.यातून आनंद वाटेल आनंदाचा वाण देता येईल असं काहीतरी केलं तर!!!

सण साजरे करणे म्हणजे तर आनंद घेणे आणि देणे अस आहे तर मग तो आनंद घेण्यासाठी व देण्यासाठी आपले शरीर आणि मन दोन्ही निरोगी असणे गरजेचे आहे. म्हणून व्यायाम करायची सुरुवात करू या. मैत्रिणीबरोबर चालायला जाऊ या व्यायाम करु यातूनही आनंदाचे वाण लुटता येईल.तुम्हाला व्यायामा आवडत नसेल तर दुसरा जो जमेल तो व्यायाम, एखादी नवीन भाषा, नवीन पदार्थ शिकू या. किंवा आतापर्यंत जे काय करायचं राहून गेले असेल ते करु या.घरातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे या करीता आपण स्वतः शिळे, फ्रीज मधील अन्न खातो, उरलेले पदार्थ आपण बायका स्वतः खातो आणि त्यांचे आरोग्य चांगले ठेवतो. निरोगी राहण्याचे वाण स्वतःच स्वतःला देऊया.आपल्या सर्वांनाच आनंदी राहायचं असेल तर आपल्याला नेमके काय करावे हे ठाऊक नसते. एखादी गोष्ट घडल्याने किंवा मिळाल्याने आपल्याला आनंद होतो पण मग तीच गोष्ट न मिळाल्याने दु खी होतो आनंदाकडे लाईटली बघत असतो. जे काम करतो ते आनंदाने करायचं, जे करायलाच हवं ते करून मोकळं व्हायचं, आपण दर महिन्याला काही गोष्टी ठरवून केल्या तर वर्षभरात आपण बरच काहीतरी साध्य करू शकतो. स्वतःसाठी वेळ काढणं स्वतःच्या शरीराचे आणि मनाची काळजी घेणं हेच वाण आजच्या काळात लुटता यायला हवं अस मला वाटत. तु तुझी काळजी घेऊन आनंदी आणि सुखाने राहण्याचे वाण लुटावेस हेच संक्रांतीचे संक्रमणाचे वाण आहे.




# मैलापूर श्री.खंडोबा यात्रा कमिटीच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री .संजय जाधव साहेब यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संतोष पुदाले/तुळजापूर धाराशिव**–तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील मैलापूर नगरीतील दि.१३ जानेवारी रोजी श्री.खंडोबा यात्रा महोत्सव व्यवस्थित पार पडल्याने दि.१४ जानेवारी रोजी श्री.खंडोबा यात्रेनिमित्त भव्य दिव्य कुस्त्या आयोजित करण्यात आले होते यावेळी धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. संजय जाधव साहेब तसेच महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण सदस्य श्री .उमाकांत मिटकरी नळदुर्ग पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे साहेब यांनी खंडेरायाच्या दर्शनासाठी आले असताना श्री. खंडोबा यात्रा कमिटी व कुस्ती समितीच्या वतीने श्री.संजय जाधव साहेब उमाकांत मिटकरी साहेब गजेंद्र सरोदे साहेब यांचे सत्कार करण्यात आला या कुस्तीसाठी डबल केसरी पैलवान कोल्हापूर पुणे सोलापूर धाराशिव अनेक ग्रामीण भागातील विशेष म्हणजे दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक महिला पैलवान कु.बलजित कौर सोबत धाराशिव परंडा येथील आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले कु. अहिल्या लवटे या दोघांची कुस्ती लावण्यात आले होते या कुस्तीसाठी शितिज इन्फा बिल्डकॉन बिल्डर्स & डेव्हलपर्स ( शितिज ग्रूप) पार्टनर जयप्रकाश दादा राजेनिंबाळकर तुषार काळे शकील शेख हर्षल जाधव इम्रान बेग यशोदा मल्टीस्टेट चेअरमन सुधीर सस्ते शितिज ग्रूप नळदुर्ग ब्रॅंच चे रिजनल मॅनेजर नेताजी महाबोले यांच्या वतीने (११०००) रू बक्षीस ठेवण्यात आले होते ही कुस्ती पंचांनी जोड केल्याने दोन्ही पैलवानांना ५० टक्के ५० टक्के रक्कम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नळदुर्ग शहरप्रमुख संतोष पुदाले तसेच धाराशिव ( LCB चे PSI ) प्रदीप सिंग ठाकूर






उपशहरप्रमुख शाम कनकधर देण्यात आला तसेच खंडोबा कुस्ती समितीचे अध्यक्ष राजकुमार ठाकूर बंडू पुदाले पिंटू मोरे शिवाजी वराडे सुधाकर चव्हाण दत्तात्रय कोरे अनिल पुदाले नंदकुमार डुकरे पांडुरंग पुदाले या सर्वांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आले व पुढील काळामध्ये असे चांगल्या प्रकारे कुस्ती भरवावे असे या ठिकाणी त्यांना शुभेच्छा देण्यात आले.

# निफाड महाविद्यालयात- "वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम"

**निफाड प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी/निफाड -प्रतिनिधी**–ज्याप्रमाणे शरीराच्या बळकटीसाठी अन्न आणि व्यायामाची गरज आहे तसेच मन व बुद्धी तल्लक, धारदार, आणि प्रवाही होण्यासाठी विविध पुस्तकांचे वाचन करणे ही काळाची गरज बनली आहे, धान्यासारखीच विचारांचीही उफणनी करावी लागते आणि मगच विचारही स्वच्छ आणि पेरण्याजोगे तयार होतात ही उफणनी म्हणजेच वाचन होय असे प्रतिपादन कविवर्य राजेंद्र सोमवंशी यांनी केले, निफाड महाविद्यालयात "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते, त्यांनी पुढे साहित्याचे सर्व प्रकार तसेच हायकू कविता, दोन ओळीची कविता चारोळी, आत्मचिंतनात्मक व अंतर्मुख करणाऱ्या विनोदी कविता सादर करत वाचनाचे महत्त्व विशद केले.या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, तर अतिथी म्हणून पत्रकार सागर निकाळे उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी म्हणाले की, निरांजनातून मिळणारा प्रकाश हा अधिक सात्विक व प्रसन्न करणारा असतो, याप्रमाणेच या धकाधकीच्या आयुष्यात वाचनच माणसाला स्थिर, सात्विक व प्रसन्न ठेवू शकते असा मौलिक संदेश त्यांनी दिला.महाविद्यालयात 01 ते 15 जानेवारी या पंधरवड्यात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक व आदेशानुसार ग्रंथ पूजन, ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन, पुस्तक परीक्षण लेखन स्पर्धा व व्याख्यान अशा विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन यशस्वीरित्या केले गेले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी, मराठी इंग्रजी व ग्रंथालय विभाग, डॉ. आर.डी. शिंदे, डॉ. सुसान लॉरेन्सिया,डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. महेश बनकर, प्रा.अभय वडघुले, डी.एच.शेंडे,प्रा.योगेश कडलग, सुनीता बोरडे, संध्या केदार, आर.एम. मत्सागर, नितीन कूंदे तसेच सर्व प्राध्यापक वर्ग आणि सेवकांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ महेश बनकर यांनी केले तर आभार एच. शेंडे यांनी मानले, या कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




# महिला सक्षमीकरण योजने अंतर्गत

## उरण पंचायत समिती सेस फंडातून ग्रामीण महिलांना कुक्कुट पिल्लांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतीनिधी**–पशुसंवर्धन विभामार्फत उरण तालुक्यात ग्रामीण भागातील महिलांसाठी 50टक्के अनुदानावर महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात आली. पंचायत समिती सेस फंडातून गट विकास अधिकारी समीर वाठरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेचा दुसरा टप्पा पुर्ण करण्यात आला. मागील तीन – चार वर्षांपासून ग्रामीण भागातील महिलांकडून कुक्कुट पिल्लांच्या योजनांची मागणी होत होती. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने कुक्कुट पिल्लांसाठी उरण तालुक्यातून अर्ज मागविले होते. प्राप्त झालेल्या एकूण 76 अर्जांपैकी 50 लाभार्थ्यांची निवड झाली. सदर लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी 60 पिल्ले प्रमाणे शासकीय अनुदानातून एकुण 3-000 पिल्लांचे आरक्षण केंद्रीय कुक्कुट विकास संस्था, गोरेगाव मुंबई येथे करण्यात आले. पहिल्या टप्प्यात उरण परिसरातील 25 लाभार्थ्यांना प्रत्येकी साठ पिल्ले वाटप करून त्यांना कुक्कुट पक्षी संगोपणाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. आज दुसऱ्या टप्प्यात चिरनेर, पिरकोन, विंधणे , वेश्वी व चिर्ले भागातील 25 लाभार्थ्यांना सहाय्यक गट विकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव यांच्या हस्ते चिरनेर येथे एकूण1500 पिल्लांचे वाटप करण्यात आले आहे. प्रशिक्षण दरम्यान कुक्कुट पिल्लांचे खाद्याचे नियोजन, थंडीपासून संरक्षण होण्यासाठी ब्रुडर व्यवस्था तसेच लसीकरण इत्यादींची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली. लाभार्थ्यांनी गरजेनुसार उपचार व लासिकरणासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ. सोमनाथ भोजने यांनी केले आहे.



# चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे पारंपारिक दिवस–२०२५ संपन्न




**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**–जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी पारंपारिक दिवसाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या दिवशी महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक पेहराव धारण करून देशातील सांस्कृतिक आणि प्रादेशिक वैविध्य सादर करत "विविधतेतून एकते" चा संदेश दिला. यासमयी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी पारंपारिक दिवसाच्या औचित्याने देशाचा सांस्कृतिक वारसा जतन करून राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेत युवकजणांची महत्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या समन्वयिका डॉ. एम. ए. म्हात्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, तिन्ही विद्याशाखांचे शाखाधिपती, जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, प्रा. अनिल नाक्ती व प्रा. प्रतिज्ञा पाटील, तसेच विविध विभागांच्या प्राध्यापकांनी एवं शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**



**पनवेल दि.१५ (संजय कदम)** :राहते घरातुन कामाला जातो असे सांगुन करंजाडे येथून एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.संतोष काशीनाथ देवरुखकर असे या बेपत्ता इसमाचे नाव असून त्याचे वय-51, त्याची उंची-5.2 फूट, बांधा साधारण, रंग - गोरा, चेहरा - गोल, केस टक्कल असलेले, फ्रेंच दाढी मिशी, अंगात हिरव्या रंगाचा फुल शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट असल्याचा पेहराव असून त्याला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा बोलता येते. सदर इसमाबाबत कोणास काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२३३३ किंवा पोहवा सुर्यकांत कुडावकर यांच्याशी संपर्क साधावा.

# सुपारी आणि मिरी चोरीतील आणखी तीन आरोपींना अटक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**–पनवेल शहर पोलिसांनी पाच कोटी रुपयांच्या सुपारी आणि मिरी चोरी प्रकरणी आणखी तीन जणांना अटक केली. रामदास कुरंगळे, श्रीकांत मंडले आणि स्वप्निल शिंदे अशी तिघांची नावे आहेत. यापूर्वीच कुणाल रमेश भानुशाली आणि सागर बांगर या दोघांना अटक करण्यात आली होती. 23 डिसेंबर रोजी पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील गाळ्यामध्ये कस्टम विभागाकडून कस्टम ड्युटी न भरलेला तीन कंपन्यांचा सुपारी आणि मिरी हा माल ठेवण्यात आला होता. यावेळी आरोपींनी सुरक्षारक्षकाला चाकूचा धाक दाखवला आणि त्याला बांधून सुपारी आणि मिरी चोरून नेला. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी कुणाल भानुशाली याला अटक केली. त्यानंतर सागर बांगर याला देखील अटक केली. या दोघांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे. त्यानंतर 10 जानेवारी रोजी पोलिसांनी रामदास भगवान कुरंगळे ( शिरढोणपाडा) याला पळस्पे येथून अटक केली तर श्रीकांत अशोक मंडले (कराड) याला सातारा येथून अटक केली. स्वप्निल सुनील शिंदे (भटवाडी, घाटकोपर) याला घाटकोपर येथून ताब्यात घेतले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रामदास याला चोरीच्या ठिकाणाची रेकी करायला सांगितली होती तर श्रीकांत याला चोरी करण्यासाठी मजूर पुरवण्यास सांगितले होते आणि स्वप्निल याला कशा प्रकारे पिशव्या, गोणी भरलेल्या आहे ते बघायला सागर बांगर याने सांगितलं होतं. चोरी केल्यानंतर या मालाची विक्री होण्यापूर्वीच पोलिसांनी हा पाच कोटींचा माल भिवंडी येथून ताब्यात घेतला. पोलिसांनी चार गाड्या जप्त केल्या आहेत. या मालाची खरेदी करणारा आणि इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल केदार करत आहेत.

==================

# विंचूरला नायलॉन मांजामुळे तरुणाचा गळा चिरला

**दैनिक युवक आधार**

**जनार्दन चव्हाण/विंचूर प्रतिनिधी/विंचूर** - मकर संक्रांत उत्सव सुरू असताना मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी नायलॉन मांजा गळ्याला अडकल्याने गंभीर दुखापत होऊन तरुणाचा गळा चिरल्याने तब्बल ४१ टाके पडले आहे.मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्येला लासलगाव-विंचूर रस्त्यावरील होळकर वेशीजवळ घटना घडली होती. बहिणीला भेटण्यासाठी जात असलेल्या रेहान शेख (१६) या तरुणाच्या गळ्याला मांजा अडकल्याने गळा खोलवर चिरला गेला. तातडीने त्याला लासलगांव येथे रुग्णालयात दाखल करून वेळीच ताबडतोब उपचार झाल्याने तरुणाचे प्राण वाचले आहे. तरुणाच्या मानेच्या नसला मोठी दुखापत झाली होती परंतु त्या ठिकाणी डॉक्टर उपस्थित होते त्यामुळे लवकर इला जाऊ शकला. नायलॉन मांजा बंद असताना तो विक्री होत असल्याने नागरिकांमध्ये त्रिव नाराजी होती. या घटनेचे पडसाद पूर्ण विंचूर शहरात उमटल्याने विंचूर शहरात #नायलॉन मांजा वापरू नका अशी मोहीम सुरू झाली होती. परिसरातील तरुणांनी याला पाठिंबा देत येथील बजरंग मंडळामध्ये तरुणानी नायलॉन मांजा कात्रीने कापून नायलान मांजा वापरू नका असे आवाहन केले होते.




# रायटर डिरेक्टर अभिनेते श्री विकास वायाळ यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**–मुंबई येथे नुकताच दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हामुनकर यांनी दादासाहेब फाळके पुरस्कार कारेक्रम आयोजित केला होता सदर सोहळयाला शेकडो कलाकार डायरेक्ट व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.उत्कृष्टाचे अभिनय करणारे श्री विकास वायाळ यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन सन्मानित केले सदर पुरस्कार मिळाल्याने अभिनेता विकास वायाळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .. विकास वायाळ यांना खालील पदावर काम करत आहे असून अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहे. रायटर डिरेक्टर अभिनेते श्री विकास वायाळ मुंबई प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटना ,मुंबई प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब फाळके चित्रपट,सदस्य अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ,सदस्य
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांना महाराष्ट्र राज्य पातळीवर **"स्वराज्य कला गौरव पुरस्कार -2024"राष्ट्रीय पातळीवरील** ओम साई प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन शिर्डी यांच्यातर्फे उत्कृष्ट अभिनेता पुरस्कार 2024

**देश पातळीवर**–दादासाहेब फाळके चित्रपट युनियन यांच्यामार्फत बेस्ट सपोर्टिंग ॲक्टर 2024 चा पुरस्कार प्राप्त झाला आहे








# स्वप्न अशी पहायची जी तुम्हाला झोपू देणार नाहीत -सुधाकर अभंग (प्रबोधनकार )



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओहाळ/खेड पुणे**–वाडा ता खेड येथे दिनांक 12 जानेवारी रोजी कर्मवीर विद्यालय वाडा तालुका खेड जिल्हा पुणे येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रबोधनकार सुधाकर अभंग यांनी विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांमध्ये यश संपादन करावे आणि कर्तुत्वान व्यक्तींप्रमाणे यशस्वी व्हावं अब्दुल कलाम विवेकानंद जिल्हाधिकारी राजेंद्र भारूड अशा विविध नामवंत व्यक्तींची उदाहरणे देऊन आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा जीवन प्रवास सांगून विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनाचा मूलमंत्र दिला. कष्ट करणाऱ्या आईबापांमुळे आणि त्यांच्या परिश्रमामुळे हे आपल्या मुलांच्या यशस्वी भवितव्यासाठी झीजत असतात झटत असतात आपल्या मुलांनी खूप मोठा व्हावं यश संपादन करावं यासाठी आई-बाबा स्वतःला किती कष्ट झाले तरी ते सहन करतात पण मुलांना काय हवं काय नको ते देण्याचा प्रयत्न करतात आई बापाच्या कष्टाची मुलांनी जाण ठेवावी आणि यश संपादन करावं ज्या क्षेत्रात आपल्याला आवड आहे त्या क्षेत्रामधला आपण छत्रपती शिवाजी महाराजांसारखा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखं आपल्या क्षेत्रात मोठे व्हावं आणि आपल्या आई-वडिलांचे आणि गुरुजनांचं नावलौकिक वाढ व्हावं असे मार्गदर्शन केले याप्रसंगी प्राध्यापक दिलीप जी बच्चे सर आणि शाळेचे प्राचार्य सन्माननीय तांबे सर उपस्थित होते.

==================

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# परिवर्तनाची गरज: समाजासाठी वैचारिक प्रबोधन

**दैनिक युवक आधार -** समाजात लग्नाच्या संदर्भातील दृष्टिकोन बदलण्याची गरज दिवसेंदिवस अधिक तीव्रतेने जाणवत आहे. लग्न जुळवताना मुलगी किंवा मुलगा यांचा केवळ शैक्षणिक बायोडाटा किंवा नोकरीची परिस्थिती पाहून निर्णय घेणे हा एकप्रकारे वरवरचा दृष्टीकोन आहे. या प्रक्रियेत खऱ्या गुणांचं, परिस्थितीसमोर उभं राहून शून्यातून जग निर्माण करण्याच्या क्षमतेचं मुल्यमापन होत नाही.सर्वांनाच सरकारी नोकरी मिळणं शक्य नाही, हे वास्तव आहे. आपल्या स्वतःच्या मुलांसाठी आपण सरकारी नोकरी मिळवून देऊ शकतो का, याचा प्रामाणिकपणे विचार करणे गरजेचे आहे. केवळ सरकारी नोकरी आहे म्हणून स्थळ स्वीकारणं, किंवा त्याशिवाय स्थळ नाकारणं हा दृष्टीकोन बदलण्याची आवश्यकता आहे.शेतकरी कुटुंबात मुलगी पाठवताना काही पालक अडचणीत सापडतात. मात्र, बागायती शेती करणाऱ्या कुटुंबाच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष जाऊन आढावा घेतल्याशिवाय निष्कर्ष काढणं अयोग्य ठरतं. शेती ही जीवनाचा आधार असून, शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळेच आपण सगळे जगतो, हे विसरता कामा नये.डिग्री असलेली तरुणाई अनेक वेळा कमी पगाराच्या नोकऱ्या करताना दिसते. डिग्री असूनही काही तरुणांना नोकरी मिळत नाही, त्यामुळे त्यांचा संघर्ष वेगळ्या स्तरावर असतो. म्हणूनच नुसता बायोडाटा बघून लग्नाचा निर्णय घेणं योग्य नाही. व्यक्तिमत्त्व, कुटुंबाच्या मूल्यसंस्था, संघर्ष करण्याची क्षमता या सर्व गोष्टींचा विचार करायला हवा.आज सरासरी आयुष्य 60 वर्षांपर्यंत सीमित आहे. त्यामुळे उशिरा लग्न करण्यामुळे आयुष्याच्या अर्ध्या वाटेवर समाधानाचं सुख गमावण्याची शक्यता वाढते. पालकांनी आपल्या मुला-मुलींच्या इच्छांचा, भावनांचा आदर करून वेळेत निर्णय घेणं गरजेचं आहे.शेती, पाणी, झाडे आणि स्त्रियांबाबत समाजाने सकारात्मक दृष्टिकोन बाळगायला हवा. आज प्रत्येकाला अन्न, पाणी, सावली हवी आहे, पण त्यासाठी झाडं लावायची, पाणी वाचवायचं, आणि शेतीचा सन्मान करायचा याकडे दुर्लक्ष होतंय. मुलगी होण्याच्या संधी नाकारल्या जात आहेत, पण चांगली सुन मात्र सर्वांनाच हवी असते. ही विरोधाभासी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे.समाजातील प्रश्नांवर विचारमंथन होणं आवश्यक आहे. खोट्या अपेक्षांवर आधारित संसार उभारल्याने मुलींच्या आयुष्याची राख होते. म्हणूनच, नातेसंबंध जोडताना वैचारिक समृद्धता, पारदर्शकता, आणि परस्पर सामंजस्याला प्राधान्य द्यायला हवं.आर्थिक, सामाजिक आणि मानसिकतेत सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रत्येकाने हातभार लावला पाहिजे. वैचारिक जागरूकता हीच समाजात परिवर्तन घडवण्याची खरी किल्ली आहे. आपण एकत्र येऊन समाजासाठी नवा विचार, नवीन आदर्श प्रस्थापित करूया.


**"एक विचार, एक बदल" या घोषवाक्याने प्रेरित होऊन समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करूया!**

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दै.युवक आधार ( मराठवाडा आवृत्ती)**

# जो मै बोलता हू.. ओ मै 100 % करता हू... शेकाप खजिनदार प्रितम म्हात्रे

## करंजाडे सेक्टर 3 येथील सोसायटी गार्डनमध्ये बसविलेल्या संरक्षण जाळीचे उदघाटन

### जे.एम. म्हाने चॅरिटेबल संस्था यांच्या निधीतून साकारले संरक्षण जाळी





**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी-**करंजाडे वसाहतीतील सेक्टर 3 येथील सोसायटीकडून तयार करण्यात आलेल्या गार्डनला रहिवासी यांच्या मागणीनुसार जे.एम. म्हाने चॅरिटेबल संस्था यांच्या निधीतून संरक्षण जाळी बसविण्यात आली आहे. त्याचे उदघाटन शेकाप खजिनदार प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवारी करण्यात आले. यावेळी नागरिकांच्या मागणी नुसार संरक्षण जाळी बसविली त्यावेळी जो मै बोलता हू वही मै करता हू असे प्रितम म्हात्रे यांनी सांगितले.करंजाडे वसाहतीमधील सेक्टर 3 परिसरातील सोसायटीच्या नागरिकांनी एकत्र येत इमारतीच्या बाजूला गार्डन तयार केले आहे. यामध्ये अनेक प्रकारच्या वृक्षाची लागवड केली आहे. याची निघा सोसायटीवासिय राखत आहेत. मात्र या गार्डन ला सरक्षित जाळीची मागणी माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्याकडे केली होती. त्यानुसार आंग्रे यांनी शेकाप खजिनदार प्रितम म्हात्रे यांना या मागणीबाबत सांगितले. त्यानुसार तात्काळ या गार्डन जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या माध्यमातून सरक्षित जाळी बांधण्यात आली. त्यांचे उदघाट्न बुधवारी लोकांच्या मनातील आमदार शेकाप चे जिल्हा खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी करंजाडे वसाहतीच्या समस्याबाबत लवकरच सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक लावून येथील प्रश्न, समस्या सोडविण्याचे प्रयत्न करणार असे म्हणत जो मै बोलता हू.. ओ मै 100 % करता हू...असे प्रितम म्हात्रे यांनी बोलताना सांगितले. यावेळी माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# ऊस तोडणीसाठी शेतकऱ्यांची पिळवणुक,कारखाण्यांनी नियंत्रण ठेवण्याची गरज

**प्रशांत तांबोळकर लातुर/शिरूर आनंतपाळ वार्ताहर-**तालुक्यात नळेगाव, साकोळ येथील मध्यम प्रकल्प व पांढरवाडी येथील लघु प्रकल्पामुळे ऊसाचे क्षेत्र मोठे असुन सध्या तालूक्यात परिपक्व झालेल्या ऊसाची तोडणी सुरु आहे. त्यातच ऊस तोडणीसाठी मजुराची संख्या कमी असल्याने ऊस तोड करणाऱ्या मजुराच्या मागे ऊस तोड करावी म्हणुन विनवणी करावी लागत आहे.दरवर्षी एक्करी हजार रुपये देऊन ऊस तोडला जायचा. यंदा तर मजुराची संख्या कमी असल्याने हा ऊस तोडणीचा दर वाढतच आहे. अनेक वेळा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस टोळीच्या मुकादमाला हजारो रुपये व एखादा बकऱ्याची पार्टी द्यावी लागत आहे. त्यामुळे लहानसहान ऊस उत्पादक शेतकरी आर्थीक आडचणीत सापडला आहे. कारखाण्याच्या शेतकी प्रशासन विभागाने ऊस तोड करणारा मुकदम व ऊस ठेकेदार यांच्यावर नियंत्रण ठेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांची लुट थांबवावी अशी मागणी येरोळ, साकोळ, धामणगाव, तळेगाव, शेंद, नागेवाडी सह शिरूरआनंतपाळ तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

**अपुऱ्या रस्त्यामुळे ऊस वहातुकीस आडचण.-** शिरुर आनंतपाळ तालुक्यात नळेगाव , साकोळ व पांढरवाडी येथील तलावामुळे पाण्याची उपलब्धता असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊसाची लागवड केली आहे. परंतु येरोळ व परिसरातील गावामध्ये शिवरस्ते व पानंदरस्ते झाले नसल्यामुळे ऊस वहातुकीस आडचण निर्माण होत आहे. याकडे आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी लक्ष देऊन या भागातील शिवरस्ते व पानंदरस्ते करुन द्यावीत अशी मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.ऊस तोड करण्यासाठी येरोळसह परिसरात विविध कारखाण्याच्या टोळ्या व हार्व्हेष्टर आले असुन ते हजारो रुपये घेतल्याशिवाय ऊस तोडण्यासाठी नारळ फोडत नाहीत. शिवाय प्रत्येक वहानचालक इंट्री म्हणुन प्रत्येक ट्रीप साठी पाचशे रुपये व जेवणाचा डब्बा मागत आहेत. सगळीकडे हेच ट्रेंन्ड सुरु असुन ऊस बागायतदारावर तोंड दाबुन मुक्याचा मार सहन करावा लागत आहे. तक्रार करावी तर आपला ऊस जाणार नाही म्हणुन ते मुग गिळुन गप्प बसत आहेत. कारखानदारांनी हि बाब गांभीर्याने घेऊन शेतकऱ्याची लुट थांबवावी अशी मागणी येथील सामाजीक कार्यकर्ते शिवाजी पेटे अध्यक्ष रयत क्रांती शेतकरी संघटणा लातुर यांनी केले आहे.



# राम कृष्ण हरी च्या गजरात अवघी सावखेड तेजन नगरी दुमदुमली

### राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त 57 व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी/सिंदखेड राजा|ज्ञानेश्वर बुधवत** :- तालुक्यातील सावखेड तेजन येथे ह. भ. प. श्री संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा येथे आयोजित करण्यात आला होता मागील 56 वर्षांची ही परंपरा गावकरी कायम ठेवत असून यावर्षी राष्ट्रसंत भगवान बाबा यांची 57 वी पुण्यतिथी मोठ्या थाटामाटात संपन्न झाली.दि. ०८ जाने रोजी या सप्ताहाची सुरुवात होऊन १५ जाने. रोजी या सप्ताहाची सांगता करण्यात आली. या वर्षाच्या सप्ताहामध्ये ह. भ. प. सोपान महाराज मुंढे यांच्या अमृतवाणीतून गावकरी व परिसरातील नागरिकांना भागवत कथा श्रावणाचा लाभ घेता आला. दि.8 जाने रोजी ह.भ.प. रमेश महाराज जायभाये यांचे कीर्तन पार पडले. त्यानंतर दि. 9 जाने रोजी ह. भ. प. ज्ञानेश्वरीकंठभूषण ह. भ. प. कृष्णा महाराज रासवे, 10 जाने रोजी ह.भ.प. भगवान महाराज, 11 जाने रोजी ह.भ.प. शिवाजी महाराज बावस्कर, 12 जाने रोजी ह.भ.प. समाधान महाराज भोजेकर, 13 जाने रोजी ह.भ.प. संतोष महाराज वनवे, 14 जाने रोजी ह. भ. प. प्रकाश महाराज साठे, व 15 जाने रोजी ह. भ. प. गणेश महाराज बडे यांचे काल्याचे किर्तन पार पडले. मागील 57 वर्षापासून ही परंपरा कायम असून मोठ्या उत्साहात श्री. संत भगवान बाबा यांची पुण्यतिथी सावखेड तेजन येथे एका सणाप्रमाणे साजरी केले जाते. "संत येती घरा,तोची दिवाळी दसरा" या उक्तीप्रमाणे सावखेड तेजन येथे सत्ताह पार पडतो यामध्ये गावातील तरुण प्रामुख्याने लक्ष घालतात आणि सप्ताह प्रारंभ झाल्यापासून सप्ताहाची सांगता व महाप्रसाद होईपर्यंत तरुण कटीबद्ध असल्याचे दरवर्षी दिसून येते.दरवर्षी शोभायात्रा काढून गाव प्रदर्शना-श्री संत भगवान बाबा पुण्यतिथीनिमित्त या सप्ताहाच्या आयोजन करण्यात येते. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी दिने या सप्ताहाची सांगता होते. यावर्षी भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी दिनी मकर संक्रात असल्यामुळे या सप्ताहाची सांगता एक दिवस उशिरा करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सप्ताह सांगताच्या दिवशी गावामध्ये शोभायात्रा काढण्यात आली. लहान मुलांपासून ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत गावकऱ्यांचा या शोभायात्रेत सहभाग असतो गावामध्ये विविध प्रकारे सजावट करून रांगोळी काढून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या रथाने ही शोभायात्रा पार पडते. गावातील भजनी मंडळ व बाहेरून आलेल्या भजनी मंडळासह सर्व भजनी मंडळ यात्रेत सहभागी होऊन गाव प्रदर्शना करतात संत भगवान बाबांच्या मंदिरावर येऊन या यात्रेची समाप्ती होते.



# ६ जानेवारी रोजी युवा कार्यप्रशिक्षणार्थी बेरोजगारांचा महामेळावा

### आष्टी तालुक्यातील प्रशिक्षणार्थींना उपस्थित रहावे- ज्ञानराज घोडके

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी-**महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बेरोजगार युवकांना प्रशिक्षणार्थी संधी उपलब्ध करून दिली होती, विविध शासकीय विभागात हे सर्व युवक कार्यरत असून, आपले कर्तव्य आणि जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम प्रकारे पार पाडत आहेत, दरम्यान सर्व युवकांना शासकीय कामाचा अनुभव आणि मार्गदर्शन उत्तम प्रकारे मिळत असल्याचे युवकांचे म्हणणे आहे परंतु या प्रशिक्षणार्थचा कालावधी हा सहा महिन्याचा असल्याकारणाने येत्या फेब्रुवारी २०२५, मध्ये हा कालावधी पूर्ण होणार आहे, त्यानंतर हे सर्व युवक बेरोजगार होणार असल्याची भीती या युवकांमध्ये आहे.महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जाहीर केल्याप्रमाणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी ज्या अस्थापानेत कार्यरत आहेत तिथेच त्यांना नियमित करण्यात येईल,असे आश्वासन दिले होते, याचीच आठवण करून देण्यासाठी आणि इतर मागण्यांकडे देवेंद्र फडणवीस सरकारचे लक्ष वेधण्याकरिता माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली१६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.००वाजता आझाद मैदान, मुंबई येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे,या मोर्चामध्ये महाराष्ट्रभरातून हजारो युवक सहभागी होणार आहेत. आष्टी तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी उपस्थित रहावे, असे आवाहन ज्ञानराज घोडके यांनी केले आहे.



# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी! आता एलटीसी अंतर्गत या गाड्यांमध्ये प्रवास करता येणार

राजधानी, शताब्दी आणि दुरांतो गाड्यांव्यतिरिक्त, आता तेजस सरकारी कर्मचाऱ्यांच्या पात्रतेनुसार एलटीसी अंतर्गत गाड्यांच्या यादीत समाविष्ट केले जावे. वंदे भारत एक्सप्रेस आणि हमसफर एक्सप्रेस सारख्या एक्सप्रेस गाड्यांमध्ये प्रवास करण्याची परवानगी असेल. केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना मोठी भेट दिली आहे. आता केंद्रीय कर्मचारी लीव्ह ट्रॅव्हल कन्सेशन अंतर्गत तेजस, वंदे भारत आणि हमसफर गाड्यांमधून प्रवास करू शकतील. एलटीसी अंतर्गत विविध प्रीमियम गाड्यांच्या प्रवेशाबाबत कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला विविध कार्यालये आणि व्यक्तींकडून अनेक सूचना मिळाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. मंगळवारी जारी केलेल्या आदेशात, डीओपीटीने म्हटले आहे की, विभागाने खर्च विभागाशी बैठक घेतली आहे. याची सर्व चौकशी केली आहे. सध्याच्या राजधानी, शताब्दी आणि दुरांतो गाड्यांव्यतिरिक्त, आता तेजस एक्सप्रेस इत्यादी गाड्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या पात्रतेनुसार एलटीसी अंतर्गत देखील समाविष्ट केले जाईल, असा निर्णय घेतला आहे. वंदे भारत एक्सप्रेस आणि हमसफर एक्सप्रेस गाड्यांमध्ये प्रवास करण्याची परवानगी असेल.एलटीसीचा लाभ घेणाऱ्या पात्र केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना पगारी रजेव्यतिरिक्त इतर प्रवासांसाठीच्या तिकिटांच्या खर्चाची परतफेड देखील मिळते.

एलटीसीचा लाभ कसा मिळवायचा?- एलटीसीचा लाभ घेणाऱ्या पात्र केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना केवळ पगारी रजाच परत मिळत नाही तर इतर प्रवासांसाठी तिकिटांवर झालेला खर्च देखील मिळतो. एलटीसी अंतर्गत, त्यांना रजा देण्याव्यतिरिक्त, सरकार प्रवासावर खर्च केलेले पैसे देखील परत करते. एलटीसीद्वारे, कर्मचारी चार वर्षांत देशाच्या कोणत्याही भागात प्रवास करू शकतात. कर्मचाऱ्यांच्या प्रवास खर्चाचा काही भाग सरकार परतफेड करते. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांसोबत सुट्ट्या घालवण्यास प्रोत्साहित करणे हा त्याचा उद्देश आहे.



# भाजप, संघच नव्हे, लढाई 'इंडियन स्टेट' विरोधात; सरसंघचालकांनाही राहुल गांधींनी केले लक्ष्य

**नवी दिल्ली :** आपण निष्पक्ष लढाई लढत आहेत, हे मनातून काढून टाका. कारण, भाजप व संघाने आपल्या देशाच्या प्रत्येक संस्थेवर ताबा मिळवला आहे. त्यामुळे आपली लढाई ही केवळ त्यांच्याविरोधात नाही, तर 'इंडियन स्टेट'विरोधात असल्याचे नमूद करत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी सत्ताधारी पक्षावर तोफ डागली.संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे वक्तव्य देशद्रोहासमान आहे. त्यांच्या वक्तव्याने भारतीयाचा अवमान झाला आहे. दुसऱ्या देशात भागवतांनी असे वक्तव्य केले असते, तर त्यांना आतापर्यंत अटक झाली असती. संविधान अवैध आहे, इंग्रजांविरोधातील युद्ध अवैध आहे, हा भागवतांच्या वक्तव्याचा मतितार्थ होतो. अशी वक्तव्य करणे बंद झाले पाहिजे, असे राहुल गांधी म्हणाले.

# वाल्मीक कराडला सात दिवस कोठडी,

## बीड न्यायालयाबाहेर राडा; परळी दुसऱ्या दिवशीही बंद

**बीड** : वाल्मीक कराड याच्यावर मकोका लावल्यानंतर त्याला बुधवारी बीड न्यायालयात हजर केले. त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी मिळाली. खोटे गुन्हे मागे घ्यावे, यासाठी परळीत दुसऱ्या दिवशीही बंद पाळण्यात आला. अनेक समर्थक टॉवरवर चढून आंदोलनही केले.न्या. सुरेखा पाटील यांच्यासमोर दुपारी सुनावणी सुरू झाली. सरकारी पक्षाच्या वतीने अड. बाळासाहेब कोल्हे, तर कराडच्या वतीने अड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी युक्तिवाद केला. अड. ठोंबरे हे छत्रपती संभाजीनगरहून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे जोडले होते.अड. कोल्हे यांनी या गुन्ह्यात कराडचा कसा सहभाग आहे, फरार आरोपी कृष्णा आंधळेसोबत काय कनेक्शन, सीडीआर तपासायचे आहेत, अशा प्रकारचे १० मुद्दे मांडून १० दिवसांची कोठडी मागितली. तर, कराडचे वकील अड. ठोंबरे यांनी या हत्येच्या गुन्ह्यात कराडचा संबंध नाही. अगोदरच १५ दिवस कोठडी घेतलेली. आता परत त्याच प्रश्नांवर कोठडीची गरज नाही. त्यामुळे न्यायालयीन कोठडी मागितली. न्या. पाटील यांनी दोन्ही युक्तिवाद ऐकून घेतल्यावर २२ जानेवारीपर्यंत कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

**बीड-परभणी प्रकरणाची न्यायालयीन चौकशी** -बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण व परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी पोलिस कोठडी मृत्यू प्रकरणांची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा राज्य सरकारने केली. देशमुख हत्या प्रकरणाची चौकशी सेवानिवृत्त न्यायाधीश एम. एल. ताहलियानी यांच्या एकसदस्यीय चौकशी समितीमार्फत होईल. तर सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीश व्ही. एल. आचलिया यांची एक सदस्यीय समिती नेमण्यात आली. या दोन्ही समितींना



कोणाही व्यक्तीला चौकशीसाठी बोलावण्याचे अधिकार असतील. न्या. आचलिया समिती परभणीत घडलेला हिंसाचाराचीही चौकशी करणार आहे.

**मागच्या दाराने नेले**-बीड न्यायालयाबाहेर कराड समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. हे पाहून पोलिसांनी समोर बंदोबस्त लावला, तर न्यायालयाच्या मागील दाराने कराडला तिसऱ्या मजल्यावरील मकोका न्यायालयात नेले. त्यानंतर पुन्हा त्याच मार्गाने खाली आणून पोलिस व्हॅनमधून बीड शहर ठाण्याच्या कोठडीत नेले.

**वकिलाची घोषणाबाजी** -कराड याला न्यायालयातून बाहेर नेत असताना, अड. हेमा पिंपळे यांच्यासह इतर महिलांनी घोषणाबाजी करत कराडला फाशी देण्याची मागणी केली. यानंतर कराड समर्थकही आक्रमक झाले. अनेक समर्थकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

=================

**महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग**

**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
**प्रशासकीय भवन दुसरा मजला कर्मवीर भाऊराव पाटील चौक आद्य क्रांतिकारी वासुदेव फडके नाट्यगृह समोर पनवेल तालुका पनवेल जिल्हा रायगड पिन ४१०२०६**
Email tahsilpanvel@gmail.com
---------------------------------------

**क्र. अप्पर /माशा/ प्रशा-१/ उशिरा मृत्यू /नोटीस२०२४**

**दि.०७/०१/२०२४**

**नोटीस**

**विषय:-** उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.
**संदर्भ:** अर्जदार सौ अनिता रमेश गायकवाड यांचा दि. ०९/११/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार सौ. अनिता रमेश गायकवाड रा. मु. पो. देवीचापाडा, ता पनवेल यांनी त्यांची सासूबाई, के, गौराबाई रामचंद्र गायकवाड यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक ०४/०२/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी, सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(संभाजी शेलार)**
**निवासी नायब तहसलिदार अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**

**तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय पनवेल**
**जुना ठाना नाका साई नगर, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६**
**दुरध्वनी क्र./ फॅक्स क्र.: ०२२-२७४५२३९९,**
ई-मेल:tahasilpanvel@gmail.com
---------------------------------------

**पत्र. क्र. मशा/प्रशा-१/उशिरा जन्म नोंद नोटीस/२०२४/२१५/२०२४**

**दि.२०/०९/२०२४**

**नोटीस**

**विषय:-** उशिरा जन्म नोंद करणेबाबत.
**संदर्भ :-** अर्जदार श्री. किशोर किसन पोरजी, रा. मु. धारनसर, ता पनवेल, जि. रायगड यांचा दि.१८/०७/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. किशोर किसन पोरजी, रा. मु. धारनसर, ता पनवेल, जि. रायगड यांनी कु. समिरा किशोर पोरजी यांची उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

२७/१२/२०२४ प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक. १५/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(संजय भालेराव)**
**प्र. निवासी नायब तहसलिदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल**

# खारघर युथ कौन्सिल या सामाजिक संस्थेतर्फे आयोजित केलेल्या भव्य टेनिस बॉल स्पर्धा

## 12 जानेवारी 2025 रोजी मोठ्या दिमाखात पार पडली..

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी-**खारघर युथ कौन्सिल ही संस्थासामाजिक,पर्यावरण,अरोग्य, शिक्षण,खेळ या क्षेत्रात कार्यरत आहे त्यांच्या तर्फे मुलांसाठी खेळा व स्वस्थ रहा तसेच मोबाईल टू मैदान या त्यांच्या अभियाना नुसार 12 जानेवारी 2025 रोजी भव्य टेनिस बॉल स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेतील विजेते ठरलेले संघ खालीलप्रमाणे

**प्रथम क्रमांक - वास्तुविहार KYC खारघर, नवी मुंबई**

**द्वितीय क्रमांक - KH1,खारघर, नवी मुंबई.**




**खेळामुळेच शरीर सुदृढ राहते**

**मैदानी खेळ ही काळाची गरज आहे असे मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात सांगीतले.यावेळी अनेक राजकीय पक्ष नेत्यांची उपस्थिती लाभली. तर पत्रकार श्री.अरुणकुमार मेहत्रे आणि श्री.संतोष वाव्हळ , संस्थेचे अधक्ष्य श्री. ज्ञानेश्वर सोरटे , सेक्रेटरी संदीप गोरे, खजिनदार दत्तात्रय पाटील तसेच संस्थेतील मान्यवर श्री. दिलीप मस्के, श्री.अशोक गोळे, श्री. पांडुरंग घुले,श्री.सुभाष नायर, श्री.रवी थोरपुझा आणि इतर सर्व राजकीय पक्षातील मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवली व खारघर युथ कौन्सिल चे आभार मानले...**

# प्रितम दादा म्हात्रे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमानी साजरा

**दैनिक युवक आधार**

**उरण वार्ताहर-**शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार प्रितम दादा म्हात्रे यांच्या वाढदिवसा निमित्त उलवे नोड येथे सामाजिक उपक्रम पार पडले.उलवे येथील आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळ, श्री. विठ्ठल -रुख्मिणी मंदिर समिती सेक्टर 16, नवयुग मित्र मंडळ सेक्टर 9, श्री गणेश सार्वजनिक मित्र मंडळ सेक्टर 17, सेक्टर 8 रहिवाशी संघटना यांच्या वतीने श्री. प्रितम दादा म्हात्रे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त भव्य रांगोळी स्पर्धा, जेष्ठ नागरिक यांच्या साठी विरंगुळा केंद्र, आणि ऑल इज वेल वृद्धाश्रमात फळ वाटप आणि इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जितेंद्र म्हात्रे, सचिन राजे, सुहास देशमुख, प्रल्हाद भगत, रोहन खंडू, महेश मगर, मिलिंद डोके, श्री. साई पैकडे, सावळाराम नलावडे, राकेश करगुटकर, अशोक फाटक, प्रमोद भगत आदीसह उलवे वासीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सातारा शहर पोलीस ठाणेतील जय गोसावी यांची पोलीस हवालदार पदी पदोन्नती, सातारा जिल्हा पोलीस दलातून अभिनंदन यांचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी संतोष लांडे-**सातारा शहर पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेले जय यशवंत गोसावी यांची नुकतीच पोलीस हवालदार पदी पदोन्नती झाल्याने सातारा शहर पोलीस ठाणेतील प्रभारी अधिकाऱ्यांसह जिल्हा पोलिस दलातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे, पोलीस हवालदार जय गोसावी मूळचे सातारा जिल्ह्यातील फलटणचे रहिवासी आहेत. त्यांनी आत्तापर्यंत ठाणे शहर पोलीस ठाणे, उल्हासनगर पोलीस ठाणे,महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, कल्याण आणि सध्या सातारा शहर पोलीस ठाणेत ते नेमणुकीस आहेत. अत्यंत शांत स्वयंमी प्रेमळ स्वभाव, आणि कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार म्हणून जय गोसावी यांची पोलीस खात्यात ओळख आहे, नुकतीच त्यांची पोलिस हवालदार पदी पदोन्नती झाल्याने सातारा शहर पोलीस ठाणेतील प्रभारी अधिकारी राजेंद्र मस्के स.पो. नि. एन.जी. केनेकर अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांनी देखील त्यांचे शहर पोलीस ठाणेत स्वागत करीत अभिनंदन केले, त्यांच्या या पदोन्नतीबद्दल सातारा जिल्हा पोलीस दलातून देखील अभिनंदनचा वर्षाव होत आहे, तसेच पोलीस हवालदार जय गोसावी यांचे समस्त पुरीगोसावी परिवाराकडूंन आणि रोखठोक महाराष्ट्र ग्रुप तसेच आम्ही सातारकर या ग्रुप कडून देखील मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालींस शुभेच्छा आहेत.



# श्री छत्रपती हायस्कूल सणसरचा शासकीय रेखा कला परीक्षेचा 100 टक्के निकाल

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय-**श्री छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयातून एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला परीक्षेस बसलेले सर्वच्या सर्व विद्यार्थी पास झाले. विद्यालयाचा शासकीय रेखा कला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला त्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.एलिमेंटरी या शासकीय रेखाकाला परीक्षेस एकूण 20 विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते.त्यातील सर्वच्या सर्व विद्यार्थी पास झाले.त्याचप्रमाणे इंटरमिजिएट परीक्षेस एकूण 35 विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यामध्ये सर्वच्या सर्व विद्यार्थी पास झाले. एलिमेंटरी या परीक्षेमध्ये अ-श्रेणीत-01.कुमारी आर्या निंबाळकर ही विद्यार्थिनी पास झाली.




तसेच इंटरमिजिएट परीक्षेत कुमारी ईश्वरी वायसे, कुमारी ऋतुजा भोसले,चिरंजीव करण गायकवाड या विद्यार्थ्यांनी अ श्रेणी मिळवली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.घाडगे परशुराम हरिदास यांचा संस्था अध्यक्ष,सर्व संचालक,गावचे सरपंच,सर्व सदस्य आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.आदर्श कला शिक्षक श्री.घाडगे सर यांचा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.सर्जे सर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# करंजाडे गावाला अनियमित पाणीपुरवठा

## गावातील महिलांनी ग्रामपंचायतीला टाळा ठोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी** -करंजाडे वसाहतीच्या समस्याचा डोंगर उभा असताना आता गावाला देखील पाणी समस्या प्रश्न उभा राहिला आहे. याबाबत ग्रामपंचायतिच्या दुर्लक्षितपणामुळे महिलांनी नुकताच ग्रामपंचायतीला टाळे ठोके आंदोलन केले. तसेच तहसीलदार व पंचायत समिती बिडीओना पाणी समस्या सोडविण्यासाठी निवेदन दिले आहे.सिडकोने नव्याने निर्माण केलेल्या करंजाडे वसाहतीमध्ये अजूनही समस्या सुटता सुटलेल्या नाहीत. यातील मुख्य प्रश्न पाण्याचा वसाहतीचा प्रश्न अजूनही सुटलेला नसताना आता करंजाडे गावाला सुद्धा पाणी समस्या सुरु झाली आहे. याबाबत गावातील महिलांनी ग्रामपंचाययतीला टाळे ठोको आंदोलन नुकतेच केले होते. त्याचबरोबर ग्रामस्थांनी तहसीलदार व बिडीओना पाणी पुरवठा प्रश्न सोडविण्यासाठी मागणी केली आहे. या पत्रामध्ये दिल्याप्रमाणे

### ग्रामस्थांचे तहसीलदार व पंचायत समिती बिडीओना निवेदन



करंजाडे गावामध्ये गेली दीड वर्ष पाणीपुरवठा अनियमित व अनियोजित प्रकारे सोडण्याचा काम करंजाडे ग्रामपंचायत करत आहे. वारंवार ग्रामस्थांनी छोटे मोठे बरेच आंदोलन केली तरीही ग्रामपंचायत व लोकप्रतिनिधी यांनी गावातील पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष केले असल्याने दीड वर्षापासून करंजाडे गावाला हक्काचा पाणी असूनही मिळत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

==================

# पनवेल प्रादेशिक कार्यालय येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी-**महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान 2025 प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल व महाराष्ट्र आम्ही एकत्र श्रमिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथे भव्य रक्तदान शिबिर बुधवार दिनांक 15 जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते या शिबिरासाठी नवी मुंबई ब्लड बँक खारघर यांचे सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये शेकडो नागरिकांनी रक्तदान केले या शिबिरात ज्याच्या रक्तदात्यांनी रक्तदान केले त्याचे प्रमाणपत्र पनवेल प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील परिवहन अधिकारी निलेश धोटे परिवहन शेख व महाराष्ट्र आम्ही एकत्र श्रमिक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर उपाध्यक्ष विवेक खाडे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आले. या कार्यक्रमासाठी संघटनेचे उपाध्यक्ष सचिन खिस्मतराव, सचिव सुजित भगत, सहसचिव कुणाल गायकवाड, खजिनदार अंकुश देसाई, सखजिनदार अभिजीत लगड, तर सदस्य म्हणून नंदकुमार साळुंखे महेश डोळस सतीश आचार्य निलेश मनोरे अमित गुप्ता मनोज विश्वकर्मा आदी कमिटी सदस्यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



## आ. प्रशांत ठाकूर यांचा मतांच्या आघाडीच्या संख्येत वृक्षारोपणाचा संकल्प

# पांडवकडा येथे वृक्षारोपण करून शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)-** विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी चौथ्यांदा विजय मिळवला. या निवडणुकीत मिळविलेल्या मतांच्या आघाडीनुसार पाच वर्षात त्या संख्येत वृक्षांचे रोपण करण्याचा संकल्प आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला आहे. त्या अनुषंगाने खारघर मधील पांडवकडा येथे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर हे पर्यवरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असतात. त्यांनी त्यांच्या वाढदिवसानिमीत्त देखील भव्य स्वरूपात वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला होता. नुकताच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांना मिळालेल्या मतांतुन ५१ हजार ९१ मतांची आघाडी घेत दणदणीत विजय मिळवला. त्याच पार्श्वभूमीवर त्यांनी आघाडी मतांच्या संख्येत येत्या ५ वर्षांमध्ये संपुर्ण पनवेल मतदार संघामध्ये या वृक्षांचे रोपण करण्याचा संकल्प केला आहे. या संकल्पाचा शुभारंभ खारघर मधील पांडवकडा परिसरात ५०० झाडांची लागवड करुन करण्यात आला. यावेळी भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रविण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अँड. मनोज भुजबळ, अँड.नरेश ठाकूर, भीमराव पोवार, शहर सरचिटणीस दिपक शिंदे, भूपेश चव्हाण, अँड. चेतन जाधव, हेमंत माने यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



================

# तळा ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांने राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत मारली बाजी

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी-**महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद धुळे द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय तेंग सू-डो क्रीडा स्पर्धा २०२४-२५ नुकत्याच पार पडल्या. १९ वर्ष मुले, ४० किलो वजनी गटात तेंग सु डो राज्यस्तरीय कराटे स्पर्धा राजे छत्रपती मार्शल आर्ट्स इंग्लिश मेडीयम पब्लिक स्कूल, पिंपळनेर तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाचा विद्यार्थी कुमार शिव हिलम याने सिल्वर मेडल पटकावले असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तळा खांबवली सारख्या ग्रामीण भागात वास्तव्य करणारा शिव हिलम याने राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत तळा ज्युनियर कॉलेजचे नाव उंचावले आहे. प्रा कसबे पी पी यांनी शिव हिलम या विद्यार्थ्याला मार्गदर्शन केले होते.नुकतेच संस्थेच्या वतीने शिव हिलम या विद्यार्थ्याला सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे व शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे यांनी शिव हिलम या विद्यार्थ्यास संस्था दत्तक घेत असून त्याचे पुढील शिक्षण संस्था करेल असे जाहीर केले. शिव हिलम या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, प्राथमिक विभागाचे चेअरमन श्री किरणशेठ देशमुख, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ श्रीनिवास वेदक, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सचिन भाटे, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे निवेदन प्रा पाटील एन सी यांनी केले, यावेळी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांची प्रेरणा घेऊन वाटचाल करावी. :- प्रा.डॉ.अशोक देवगुडे

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडवणी येथे उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)-**युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचार व कार्याची प्रेरणा घेऊन भविष्यातील वाटचाल करावी असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते प्राध्यापक डॉ.अशोक देवगुडे यांनी केले ते वडवणी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम व राष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की स्वामी विवेकानंदांनी युवकांना प्रेरीत करण्यासाठी आत्मविश्वास, योग, ध्यान, स्वदेश प्रेम, व राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवा या मूल्यांचा युवकांनी अंगीकार करावा असे युवकांना त्यांनी आव्हान केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाचा उद्योजक पुरस्कार प्राप्त युवा उद्योजक श्री.बाबासाहेब कुरकुटे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी शहराचे नगराध्यक्ष मा.श्री.शेषराव जगताप यांची उपस्थिती होती तसेच व्यासपीठावर मार्गदर्शक प्राध्यापक गंगाभीषण अंडील, उद्योजक श्री.देशपांडे साहेब व प्राध्यापक इंगोले बी.एस. यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या



कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापक श्रीमती देशपांडे मॅडम यांनी केले. या नंतर प्रा.गंगाभीषण अंडील यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी नगराध्यक्ष श्री.शेषेराव जगताप यांनी जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त शुभेच्छा देऊन या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.बाबासाहेब कुरकुटे यांनी उद्योग उभा करताना येणाऱ्या अडचणी या अडचणींना न डगमगता आपलं ध्येय प्राप्त करण्यासाठी आपण सुरू केलेला उद्योग याची भरभराटी कशी होईल. याचा मूलमंत्र दिला. या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने विविध घेतलेल्या स्पर्धेचं बक्षीस वितरण अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचलन श्री.मुळे के.एस. यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मा.श्री.बनगे एस.ओ.यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. राठोड एस.एल., श्री मुळे के.एस., प्रा.श्रीमती देशपांडे एल.एस., प्रा.मोमिनियम एम.एच., श्री. उच्छैय डी.एल., कुमारी ठोंबरे एस.डी., श्री. मुंडे के.एस., श्री.पठाण एम., श्री .सुरवसे एम.ए., श्री केदार एम.बी., श्री. आंधळे ए.एम. सह आदींनी अथक परिश्रम घेतले. शेवटी या कार्यक्रमाचे आभार श्री.मुळे के.एस.यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद व वडवणी शहरातील युवा उद्योजक व बहुसंख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.